साक्षीदार क्र.१ यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु.

१३. शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे असून तो बरोबर आहे. त्यावरील माझी सही आहे. याचिकेसोबत, मी पोलिस कागदपत्रांसह काही कागदपत्रे दाखल केली आहेत, ती खालीलप्रमाणे:-
(१) एफ.आय.आर.ची सत्यप्रत **(नि.२७),** (२) घटनास्थळाच्या पंचनाम्याची सत्यप्रत **(नि.२८),** (३) मरणोत्तर शव पंचनाम्याची सत्यप्रत **(नि.२९),** (४) शवविच्छेदन अहवालाची सत्यप्रत **(नि.३०),** (५) शिवाजी नगर पोलीस ठाणे यांना सह्याद्री हॉस्पीटल येथून दिलेल्या पत्राची सत्यप्रत **(नि.३१),** (६) अकस्मात मृत्यू खबर क्र.००/२२ ची सत्यप्रत **(नि.३२),** (७) ग्रामीण रुग्णालय, औसा यांनी पोलीस ठाणे, औसा यांना पाठविलेल्या पत्राची प्रत **(नि.३३),** (७) फॉर्म 'कॉम्प एए' ची सत्य प्रत **(नि.३४),** (९) एमएच-२४/एएस-९३४० क्रमांकाच्या वाहनाच्या तपासणी अहवालाची सत्यप्रत **(नि.३५),** (१०) दोषारोपपत्राची सत्यप्रत **(नि.३६),** (११) एमएच-२४/एएस-९३४० क्रमांकाच्या वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत **(नि.३७),** (१२) एमएच-२४/एएस-९३४० क्रमांकाच्या वाहनाच्या विमा पॉलीसीची सत्यप्रत **(नि.३८)** आणि (१३) तानाजी यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची सत्यप्रत **(नि.३९).**

**उलट-तपासणी: श्री. ए.ए. पाटील, वकील गैरअर्जदार क्र.१ व २ तर्फे.**

१४. पुकारले असता गैरहजर. सबब उलट-तपासणी नाही.

**उलट-तपासणी: श्री. एस.एन. गुरव, वकील गैरअर्जदार क्र.३ तर्फे.**

१५. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. माझ्या पतीचे शिक्षण १० वी पर्यंत झाले होते. पुन्हा सांगते की, लग्नाला एक वर्षच झाले होते त्यामुळे त्यांच्या शिक्षणाविषयी मला माहीती नाही. अपघातावेळी मी घरी होते. हे खरे आहे की, मी अपघात प्रत्यक्ष पाहिला नाही. दिनांक

२५.११.२०२२ पर्यंत फिर्याद देण्यात आली नव्हती.

८.  हे खरे नाही की, एमए-२४/एएस-९३४० क्रमांकाच्या वाहनाच्या चालकाने निष्काळजीपणाने, अविचाराने वाहन चालविल्याने अपघात झाला हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, आम्ही पोलीसांसोबत संगनमत करुन कार चालकाविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे खरे नाही की, घडलेल्या अपघातामध्ये कार चालकाची कोणतीही चूक नव्हती.

९.  माझ्या पतीच्या वयासंदर्भात पुरावा दाखल केला आहे. काय पुरावा दाखल केला याविषयी मी कांही सांगू शकत नाही. हे खरे नाही की, अपघाताच्या वेळी माझ्या पतीचे वय ३० वर्षापेक्षा जास्त होते. हे खरे नाही की, माझे पती जमीनीची मोजणी करुन दरमहा रु.१५,०००/- कमावित होते हे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, शेतजमीनीमधून माझे पती वार्षीक ३ लाख रुपये कमावित होते असे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, माझ्या पतीच्या उपचारासाठी रु.४०,०००/- खर्च आला असे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, जास्तीची नुकसानभरपाई मिळावी म्हणून खोटे शपथपत्र दाखल केले असून, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेर-तपासः नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.07.21 17:23:58 +0530

**( एस. व्ही. जाधव )**
**जिल्हा न्यायाधीश-४ तथा**
**सदस्य, मो.अ.दा.प्रा.लातूर.**

**दिनांकः २१.०७.२०२५.**